14 APR 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकरांचा व्यापक विचार देशाच्या विकासासाठी मार्गदर्शक

## डॉ. प्रल्हाद लुल्हेकर : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर, ता. १३ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा व्यापक विचार देशाच्या विकासासाठी मार्गदर्शक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रल्हाद लुल्हेकर यांनी आज येथे केले.


शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे आयोजित 'फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह'अंतर्गत आयोजित 'अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा : दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर' विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्ष्यस्थानी होते. राजर्षी शाहू सभागृहात त्याचे आयोजन केले होते.

डॉ. लुल्हेकर म्हणाले, 'दलितोद्धार व संविधान निर्मितीत डॉ. आंबेडकर यांचे महान कार्य होते. त्यांच्या कार्याचे व विचारांचे बहुपैलुत्व समजून घ्यावे लागेल. त्यांना समजून घेण्यात आजपर्यंत गफलती झाल्या आहेत. त्यांना सीमित करून टाकले आहे. ते आयुष्यभर देशाचा विचार करणारे होते. त्यांनी व महात्मा फुले यांनी केलेले कार्य भारतीय इतिहास बदलणारे व येथील जातीव्यवस्थेच्या विरोधातील होते. त्यांचे विषय देशाच्या आर्थिक स्थितीशी संबंधित होते. त्यांनी शेती आणि शेतकरी यांचे प्रश्न एकत्रितपणे विचार करून सोडविणे आवश्यक असल्याचा विचार मांडला.' या वेळी सप्ताहात आयोजित वक्तृत्व स्पर्धेतील पदवीधर गटातील विजेता अमृता पांडुरंग सागर, उपविजेता आदित्य सोनवणे, तृतीय क्रमांक प्राप्त पृथ्वी जोरे, तर पदव्युत्तर गटातील विजेती शिवानी निंगाप्पा गजबर, उपविजेता अनिरुद्ध मराठे, तर इंद्रजा विठ्ठल गोरे व प्रणव राजेश गुरव यांना उत्तेजनार्थ बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

14 APR 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**डॉ. आंबेडकर म्हणाले होते...** घटना चांगली की वाईट, यापेक्षा घटना राबवणारे लोक कोण? त्यांचा उद्देश कोणता? यावर राज्यघटनेचे यशापयश ठरेल.

# घटनात्मक नैतिकता शिकणे अजून बाकी...

**प्रकाश पवार,** राजकीय विश्लेषक

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज प्रतिबद्ध (organic thinker) विचारवंत म्हणून जगभर सर्वत्र ओळखले जाते. त्यांचे भारतीय संविधान निर्मितीतील कार्य सामाजिक न्याय, नागरी समाज घडवणे, समाजाचे विवेकीकरण करणे इत्यादी क्षेत्रात महत्त्वपूर्ण आहे. डॉ. आंबेडकर यांच्या संविधान विषयक कार्याचे नवीन पैलू सैद्धांतिक स्वरूपात आजही विकसित होत आहेत. विशेषतः तीन नवीन पैलूंची चर्चा नव्याने सुरू झालेली आहे. एक, भारतीय संविधानाच्या लिखाणाबरोबरच संविधानाच्या चर्चांमध्ये त्यांनी अभ्यासपूर्ण सहभाग घेतला होता. त्यावरील आंबेडकरांचा सरनामा (Ambedkar's preamble) हे पुस्तक अगदी अलीकडे प्रकाशित झाले आहे. दोन, राज्यघटना लिहिल्यानंतर त्यांनी केलेल्या भाषणांमधून घटनात्मक नैतिकता हा एक स्वतंत्र विचार मांडला. तीन, घटना चांगली आहे की वाईट आहे, यापेक्षा घटना राबवणारे लोक कोण आहेत? त्यांचा उद्देश कोणता आहे? यावर भारतीय राज्यघटनेचे यशापयश ठरेल, अशी भूमिका त्यांनी मांडली होती.

## डॉ. आंबेडकरांचा सरनामा

१ आकाश सिंग राठोड यांनी 'आंबेडकरांची प्रस्तावना : भारताच्या संविधानाचा एक गूढ इतिहास' हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकात त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व राष्ट्र या संकल्पना भारतीय राज्यघटनेच्या आधारस्तंभ आहेत, अशी मांडणी केली आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या सरनाम्यापेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सरनामा वेगळा होता.

२ परंतु तो एकमेकांच्या विचारांना पूरक होता. डॉ. आंबेडकरांनी राष्ट्र, राजकीय संस्था व न्यायाच्या चौकटीत घटना समितीमध्ये वेगवेगळी भाष्ये केली. घटनेचा प्रदीर्घ मसुदा तयार केल्यानंतर डॉ. आंबेडकरांचे काम संपले नाही.

३ कारण, यानंतर घटना समितीत न्यायाची चर्चा घडली. न्यायाच्या संदर्भात घटना समितीत चर्चांना समर्पक उत्तरे देणे, प्रत्येक कलमावर चर्चेला योग्य दिशा देणे, दुरुस्तींचा विचार करून घटनेला अंतिम स्वरूप देणे अशी विविध स्वरूपाची कार्ये डॉ. आंबेडकरांना करावी लागत होती.

४ कलमावर चर्चेत सुचवल्या जाणाऱ्या दुरुस्त्या स्वीकारण्यात किंवा फेटाळण्यात त्यांचाही निर्णय त्यांना घ्यावा लागे. अनेक वेळा नवीन शब्दप्रयोगही त्यांना सुचवावे लागत. घटना समिती हे एक विधिमंडळच होते.

५ एखादा मोठा कायदा, प्रदीर्घ चर्चा, त्यामधील स्वरूप, त्यांना उत्तरे देणे व मान्य करून घेणे ही एक न्यायासाठीची मोठी घडामोड होती. त्यांनी ही कामे 'न्याय' या चौकटीत परिश्रमपूर्वक केली. घटना समितीतील कामकाज अवघड होते.

## डॉ. आंबेडकरांच्या घटनात्मक नैतिकतेचे पाच मुख्य स्रोत

१ भारतातील एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील चळवळींमधील स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, प्रतिष्ठा याबद्दलची जबाबदारी. त्यांचा राज्यघटनेशी जोडलेला संबंध. यामुळे राज्यघटना भारतीय लोकांच्या आकांक्षांचे प्रतिबिंब ठरली.

२ राज्यघटनेतील घटनात्मक कलमे. उदाहरणार्थ, ३७७. राज्यघटनेच्या सर्वोच्च स्थानास महत्त्व दिले गेले.

३ घटना समितीतील वाद-विवाद आणि त्यामधील घटनात्मक प्रक्रियेबद्दल एकमत होते. राज्यघटनेने विशेष संसदीय पद्धती आणि आत्मसंयमाच्या तत्त्वाला अधोरेखित केले गेले. शासनाच्या सत्तेवर कायदेशीर अंकुश ठेवणे, हा कळीचा विचार यामधील आहे.

४ सर्वोच्च न्यायालय आणि बुद्धिजीवी वर्गाने केलेले युक्तिवाद त्यांनी स्पष्ट केले. विशेषतः एक नागरिक म्हणून संविधानाबद्दल आदर, घटनात्मक कर्तव्यांचे पालन, सत्ता स्पर्धा, सत्ताधारी व विरोधक यांनी राज्यघटनेचा आदर करावा, या गोष्टींचा समावेश त्यांनी घटनात्मक नैतिकतेत केला.

५ डॉ. आंबेडकरांनी सार्वजनिक नैतिकता आणि घटनात्मक नैतिकता यापैकी घटनात्मक नैतिकतेला अग्रक्रम दिला.

## घटनात्मक नैतिकता

- डॉ. आंबेडकरांनी ४ नोव्हेंबर १९४८ रोजी 'द ड्राफ्ट कॉन्स्टिट्यूशन'मध्ये 'घटनात्मक नैतिकता' ही संकल्पना प्रथम मांडली. २५ नोव्हेंबर १९४९ च्या वाद-विवादात या नैतिकतेची चर्चा त्यांनी केली होती.
- १० जून, १९५० रोजी त्रिवेंद्रम येथील लेजिस्लेटिव्ह चेंबरमध्ये 'घटना आणि घटनात्मक नैतिकता' या विषयावर त्यांनी भाषण केले.
- घटनात्मक नैतिकता ही नैसर्गिक भावना नाही. ही भावना सामाजिकीकरणाशी संबंधित असते. त्यांनी ग्रोटे यांच्या घटनात्मक विचारांचा संदर्भ घेतला होता.
- स्वातंत्र्य व आत्मसंयम हे मुद्दे महत्त्वाचे होते. भारतात लोकशाही दिखाऊच आहे. भारतीयांनी घटनात्मक नैतिकता अजून शिकणे बाकी आहे. ही त्यांची भूमिका होती.

## ...म्हणून घटनात्मक नैतिकता आवश्यक


- सार्वजनिक नैतिकता सामाजिक मानदंडांना मान्यता देते. यामुळे सार्वजनिक नैतिकता बहुविविधतेला मान्यता देते. त्यांच्या मते, भारतासारख्या देशात सार्वजनिक नैतिकता पुरेशी ठरत नाही. त्यांना घटनात्मक नैतिकतेच्या क्षेत्राची जास्त गरज वाटत होती. कारण, सत्ता ही घटनात्मक कायद्याच्या अंतर्गत असावी. सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांची पूर्ती घटनात्मक पद्धतीने झाली पाहिजे. याचा अर्थ डॉ. आंबेडकरांनी हिंसक क्रांतिकारी पद्धत अमान्य केली होती. एवढेच नाही, तर त्यांनी सविनय कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रह या पद्धती अमान्य केल्या. त्यांनी परिवर्तनासाठी घटनात्मक नैतिकता हा मार्ग निवडला होता. त्यांनी हिंसक क्रांती व निष्क्रिय प्रतिकार यांना जवळपास समान संबोधिले होते. त्या दोन्ही पद्धतीत बळाचा वापर होतो, तर घटनात्मक नैतिकतेमुळे सरकार संपूर्णपणे प्रज्ञेच्या व चिकित्सेच्या अधीन असते.
- घटनात्मक नैतिकतेचा बहुलता हा एक महत्त्वाचा घटक आहे. डॉ. आंबेडकरांनी बहुविविधतेला त्याच्या सर्वांत खोल आशयासह मान्यता दिली होती. म. गांधी व डॉ. आंबेडकरांमध्ये अहिंसेच्या विचाराबद्दल मतभिन्नता होती. तरीही त्यांनी घटनात्मक नैतिकतेमध्ये अहिंसेला स्थान दिले होते. मतभिन्नतेमधून घटनात्मक प्रक्रियेने मार्ग काढण्यासाठी अहिंसा उपयुक्त ठरते. संसद, न्यायालय यांच्या केंद्रस्थानी सदाचार आहे. लोकांच्या आणि प्रतिनिधित्वाच्या दाव्यात त्यांनी घटनात्मक नैतिकता मांडली होती.
- डॉ. आंबेडकरांनी विभूतिपूजा अमान्य केली. त्यांनी लोकानुरंजनवादी सार्वभौमत्व घटनाविरोधी मानले होते. आपल्याला लोकशाही केवळ एक बाह्य देखावा म्हणून नव्हे; तर वस्तुस्थिती म्हणून टिकवून ठेवायची असेल तर आपण काय केले पाहिजे? माझ्या (डॉ. आंबेडकर) दृष्टीने आपण पहिली गोष्ट अशी करायला हवी की, आपली सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे फक्त संवैधानिक मार्गानेच पदरात पाडून घेण्यावर आपण कटाक्ष ठेवला पाहिजे. म्हणजेच आपण क्रांतीच्या रक्तरंजित पद्धतींना पूर्ण सोडचिठ्ठी दिली पाहिजे. यापुढे संविधानिक मार्ग खुले आहेत, तेथे असंवैधानिक मार्गांचा अवलंब करण्याचे कोणतेही समर्थन करता येणार नाही. त्या पद्धती म्हणजे फक्त अराजकाचे व्याकरण असतात आणि त्यांचा आपण जितक्या लवकर त्याग करू तितके आपल्या भल्याचे होईल, असा सल्ला त्यांनी दिला होता.

14 APR 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बहुपेडी व्यक्तिमत्त्व



'खाली जमीन वर आकाश' या लवटे सरांच्या आत्मकथाने वंचित अनाथ मुलांच्या करुण आणि केविल जगाचे घडवलेले दर्शन मराठी साहित्यात नवे होते. आजघडीला त्यांची पंचाहत्तरहून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तसेच 'आंतरभारतीचे उपासक' म्हणून त्यांना गौरविण्यात येते. समाजाविषयी निरंतर कृतज्ञताभाव आणि 'करके देखो' यावर त्यांचा अपार विश्वास आहे. 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर' हे ब्रीद अटीतटीने सांभाळत कार्यमग्नता हा त्यांचा विशेष. लोकांना मदत करणे, त्यांना विश्वास देणे ही त्यांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये आहेत. तरुणांना लाजवणारी साने गुरुजींच्या धडपडणाऱ्या मुलांची शोधकदृष्टी आजही व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा भाग आहे.

प्रा. सुनीलकुमार लवटे

प्राचार्य सुनीलकुमार लवटे यांची महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनात वेगळी अशी ओळख निर्माण आहे, ती त्यांच्या बहुपेडी कार्यामुळे. डॉ. लवटे यांच्या व्यक्तिमत्त्वात अनेकविध स्वरूपाची ऊर्जाकेंद्रे आहेत. आणि अशा या विविध कार्यात ते नेहमी कार्यमग्न असतात. डॉ. लवटे यांची ओळख केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरती मर्यादित नाही. तर त्यांच्या अनेकविध कामांमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला बहुस्वरीयता प्राप्त झाली आहे. तळमळीचे व्यासंगी शिक्षक, निष्ठावान कार्यकर्ता, शिक्षक संघटनेचे नेते, अनाथ वंचिताच्या चळवळीतले कार्यकर्ते, स्मृति संग्रहालयकार, संपादक, संशोधक, प्राचार्य, अनुवादक, संघटक अशा बहुमुखी कार्याचे एकवटलेपण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात विसावलेले आहे. लवटे यांच्या या साऱ्या कार्याची गंगोत्री ही त्यांच्या निरलस आणि लोभस व्यक्तिमत्त्वात दडलेली आहे. सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यातील सकारात्मक ओसंडणारी उर्जा त्यांच्या व्यक्तित्त्वाचा महत्त्वाचा विशेष आहे. पंढरपूर येथील प्रार्थना समाजाच्या वा. बा. नवरंगे बालकाश्रमात लवटे यांचे बालपण गेले. पुढे कोल्हापुरातील बालसंकुलात ते दाखल झाले ते आजतागायत सहा दशकाहून अधिक काळ कोल्हापूरच्या जीवनाशी समरस झाले आहेत. साने गुरुजींच्या आंतरभारतीचे स्वप्न आणि वि. स. खांडेकरांच्या स्वप्नाळू ध्येयवादी दृष्टीची गुंफण लवटे यांच्या कार्यात आहे. अनाथांचे जगणे त्यांनी जवळून पाहिले आहे. त्यांना स्वतःला या अनाथपणाचे जीवघेणे चटके बसलेले आहेत. मात्र त्याचे रडगाणे त्यांनी कधी गायिले नाही. किंवा सहानुभूतीच्या निवाऱ्याला गेले नाही. नित्य नवा कार्यशोध हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष.

सुनीलकुमार लवटे यांच्या कार्यविचार दृष्टीत आंतरभारती घडणीचा मोठा प्रभाव आहे. त्यामुळेच त्यांच्या एकंदर विचारदृष्टीत समन्वय संगम दृष्टीला महत्त्व आहे. भेदाला, एकारलेपणाला व आग्रही वितंडवादाला वळसा घालून ते आपली कामे चालू ठेवतात. कामाची अखंड उर्जा आणि झपाटा हा त्यांचा लोकविलक्षण गुण. संशोधनाचे महाप्रकल्प हाती घेणे व ते जिद्दीने तडीस नेणे हा त्यांचा परिपाठ. यात एक अखंड शोधक वृत्ती आहे. या दृष्टीने विविध व्यक्ती वा संस्थांमधून त्यांनी असंख्य कागदपत्रे व संदर्भसाधने मिळविली आहेत. डॉ. लवटे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेले दोन महत्त्वाचे अनुवाद प्रकल्प म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड व नरेंद्र दाभोलकर यांच्या वाङ्मयाचा प्रकल्प. या दोन विचारवंतांचे कार्य अनुवादरूपाने भारतीय पातळीवर नेण्याचे काम झाले आहे.

वि. स. खांडेकरांच्या जीवितकार्याने भारावलेले सश्रद्ध अभ्यासक अशीही त्यांची ओळख आहे. गेल्या तीस वर्षात खांडेकरांच्या जीवनकार्याचा मिशनरीवृत्तीने ते शोध घेत आले आहेत. खांडेकरांच्या असंग्रहित आणि अप्रकाशित वाङ्मयाची तीसहून अधिक पुस्तके प्रकाशित केली आहेत. खांडेकरांच्या वाङ्मयाचे महत्त्व अधोरेखित करण्यात व त्यास अर्थनिर्णयाच्या नव्या कक्षा प्राप्त करून देण्यात त्यांच्या या संपादनकार्याचा महत्त्वाचा वाटा आहे. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व शिरोडे येथे उभारलेल्या खांडेकर संग्रहालय उभा करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. खांडेकरांच्या विविध वस्तू, कागदपत्रे, स्मृतिचिन्हे, छायाचित्रे, पत्रे, ग्रंथ, कात्रणे हे त्यांनी साधक वृत्तीने मिळविली आहेत. त्यांच्या या प्रकारच्या कामातील साधना आणि संयमी विनयवृत्ती ही आजच जीवनातील दुर्मिळ गोष्ट म्हणावी लागते. या संग्रहालयांची ठेवण, मांडणी व आकारिक सौंदर्यशास्त्र हे त्यांच्या कल्पक दृष्टीची साक्ष आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात यशवंतराव चव्हाण यांचेही संग्रहालय उभे केले आहे, तसेच माणगाव येथे सानेगुरुजींचे.

त्यांचा एक महत्त्वकांक्षी प्रकल्प म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या समग्र वाङ्मयाचा प्रकल्प. तो लवकरच प्रकाशनाधीन आहे. साडेदहा हजार पानांचा तर्कतीर्थांचा हा दस्तऐवज अठरा खंडात प्रसिद्ध होत आहे. तर्कतीर्थांचे विखुरलेले वैचारिक, ललित, अनुवाद, प्रस्तावना, लेख पत्र वाङ्मयाचा यात समावेश आहे. महाराष्ट्राच्या विचारपरंपरेतला हा महत्त्वाचा दस्तऐवज आहे.

- प्रा. रणधीर शिंदे
(लेखक शिवाजी विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक आहेत.)